मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# पिंपरी-चिंचवड महापालिकेत 'चहापान' खर्चावर प्रश्नचिन्ह

## नगरसेवक व समर्थकांच्या मागण्यांमुळे वाढता खर्च; प्रशासनावर ताण, नागरिकांची नाराजी वाढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेवक म्हणून मिरवण्याचे अनेकांचे स्वप्न असते. त्यासाठी अनेक वर्षे प्रयत्नाची पराकाष्टा केली जाते. एकदा का, महापालिका सभागृहात प्रवेश केला की, त्यांच्यासह नातेवाईकांच्या अपेक्षा वाढतात. आपल्या प्रभागातील विकासकामांपेक्षा महापालिका तसेच, क्षेत्रीय कार्यालयात तसेच, सार्वजनिक कार्यक्रमात रुबाब करण्यावर त्याचा भर दिसतो.

अपेक्षा वाढल्याने काही नगरसेवकांसह त्यांचे नातेवाईक, मित्रमंडळी, समर्थकही महापालिकेत चहापान आणि अल्पोहारासाठी कर्मचाऱ्यांना आदेश देत आहेत. प्रसंगी अरेरावी करत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सन्मानीयांच्या आप्तेष्टांचे फुकटचे चोचले पुरवण्यात प्रशासन मश्गुल झाले असून, त्यावर मोठा खर्च होत असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे.




महापालिकेत अधिकारी म्हणून रुजू होण्यासाठी राज्यभरातील अधिकारी तीव्र इच्छुक असतात. त्यासाठी पडद्यामागे बरेच प्रयत्न केले जातात. त्याबरोबरीने महापालिकेत नगरसेवक होण्यासाठी अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वप्न असते. बरीच मेहनत घेतल्यानंतर काहींना निवडणुकीत यश मिळते. महापालिकेत नगरसेवक म्हणून प्रवेश केल्यानंतर साहजिकच त्यांचा रुबाब वाढतो. अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्या सन्मानीयांचा यथायोग्य आदर व सन्मान केला जातो. त्यामुळे काही नगरसेवक हुरळून जात असल्याचे चित्र आहे.

नगरसेवकांसह त्यांचे नातेवाईक, कुटुंबीय, समर्थक व कार्यकर्तेही महापालिका कारभारात हस्तक्षेप करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांचा महापालिकेसह क्षेत्रीय कार्यालयात राबता वाढला आहे. चहा, कॉफीसोबत बिस्किट, मस्कापाव, शंकरपाळ्या, भजी अशा स्वादिस्ट व रूचकर खाद्यपदार्थांची ऑर्डर कर्मचाऱ्यांना दिली जात आहे. त्यासाठी प्रसंगी कर्मचाऱ्यांवर अरेरावी केली जात असल्याचे काही घटनांवरून समोर आले आहे.

तळमजल्यापासून चौथ्या मजल्यापर्यंत नगरसेवकांचे संबंधित व्यक्ती कोणत्या ना कोणत्या विभागात हष्टीस पडत आहेत. एकाच कामासाठी नगरसेवकांसह त्यांच्या कार्यकर्त्यांचाही सातत्याने हस्तक्षेप होत असल्याने अधिकाऱ्यांसह कर्मचारी हैराण झाले आहेत. त्यांचे आदरातिथ्य करण्यात अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा वेळ खर्ची पडत आहे. परिणामी, सर्वसामान्य नागरिकांना अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी अधिक वेळ प्रतिक्षा करत बसावे लागते.

### चहापान बिल स्थायी समितीकडे

**» महापालिका भवनात तिसऱ्या मजल्यावर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, सत्तारूढ पक्षनेते, गटनेते तसेच, विविध विषय समितीच्या सभापतीचे दालन आहेत. त्या प्रत्येक दालनातील चहापानाचा खर्च स्थायी समितीकडून केला जातो. चहापानावर दर आठवड्याला अंदाजे 50 हजार ते 75 हजार रुपये खर्च होत आहे.**

### सध्या धनादेशाद्वारे मानधन

**» सर्व 128 नगरसेवकांकडून आवश्यक कागदपत्रे न मिळाल्याने आरटीजीएसची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सर्व नगरसेवकांना धनादेशाद्वारे मानधन अदा केले जात आहे. आरटीजीएससाठी सर्वांची नोंदणी झाल्यानंतर प्रत्येक नगरसेवकास ऑनलाईन माध्यमातून मानधन वितरित केले जाईल, असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले**

# पीएमआरडीएच्या 29 रस्ते प्रकल्पांना गती; 'थर्ड पार्टी' ऑडिट अनिवार्य

## कामाच्या गुणवत्तेवर भर; पावसाळ्यापूर्वी प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट, ग्रामीण विकासाला चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाची पावले उचलली आहेत. प्राधिकरणाच्या 29 महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांचा आढावा घेत पीएमआरडीए आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी कामांना गती देण्याचे निर्देश दिले असून, कामाच्या गुणवत्तेसाठी 'थर्ड पार्टी' ऑडिट अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे प्रकल्पांमध्ये पारदर्शकता वाढण्याबरोबरच टिकाऊ दर्जाही सुनिश्चित होणार आहे




पीएमआरडीएचे कार्यक्षेत्र तब्बल 5,215 चौरस किलोमीटर इतके विस्तीर्ण असून, त्यात मावळ, मुळशी, हवेली, भोर, दौंड, शिरूर, खेड, पुरंदर आणि वेल्हे या नऊ तालुक्यांतील 674 गावांचा समावेश आहे. या ग्रामीण भागांमध्ये सक्षम रस्ते जाळे उभारल्यास औद्योगिक, व्यावसायिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

अभियांत्रिकी विभागासोबत झालेल्या बैठकीत आयुक्तांनी प्रलंबित आणि सुरू असलेल्या प्रकल्पांचा सखोल आढावा घेतला. विशेषतः पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. रस्त्यांच्या कामांमध्ये होणारा विलंब टाळण्यासाठी तांत्रिक प्रक्रियांमध्ये शिस्त आणण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### ग्रामीण विकासाला चालना

**» पीएमआरडीए क्षेत्रातील ग्रामीण भाग मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रस्ते जोडणी अत्यंत महत्त्वाची आहे. सध्या अनेक गावांमध्ये मूलभूत सुविधा पोहोचवण्यात अडचणी येतात. सुधारित रस्ते नेटवर्कमुळे वाहतूक सुलभ होऊन बाजारपेठ, शिक्षण आणि आरोग्य सुविधा अधिक सहज उपलब्ध होतील.**

# ब्रिटिश पार्लमेंटमध्ये उद्योजक भरत गीते यांना ‘ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर 2026’ पुरस्कार

## ब्रिटिश संसदेत 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' भरत गीते यांना ‘हाऊस ऑफ कॉमन्स’, ‘ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर 2026’ पुरस्कार



**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठी उद्योजक व तौरल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांना ब्रिटिश पार्लमेंटमधील प्रतिष्ठित ‘ग्लोबल इन्स्पिरेशन ऑफ द इयर २०२६’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच गीते यांना ‘हाऊस ऑफ कॉमन्स’ या विशेष सन्मानानेही गौरविण्यात आले. 'ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गीते यांच्या कार्याचा जागतिक स्तरावर झालेला हा गौरव भारताच्या उद्योगविश्वासाठी आणि महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

लंडन येथील ब्रिटिश संसदेच्या पोर्टक्युलिस हाऊसमधील बुथरॉईड कक्षात हा सोहळा नुकताच पार पडला. दक्षिण आशियाई वाणिज्य व उद्योग मंडळाच्या वतीने गुजरात आणि महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योगपती अलोक किर्लोस्कर यांनाही याच पुरस्काराने गौरविण्यात आले. दोन्ही उद्योजकांच्या कार्यामुळे या सन्मानाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. या कार्यक्रमास ब्रिटनचे खासदार लुईस फ्रेंच, मराठी मंडळ लंडनचे सुशील गायकवाड, लॉर्ड रामिंडेर रेंजर, ओशियन अँड नॅचरल रिसोर्सेस संचालनालयाचे वरिष्ठ वाणिज्य संचालक सुरेश यादव, साऊथ एशियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे चेअरमन महेंद्रसिंह जडेजा आदी उपस्थित होते.

भरत गीते यांनी उद्योगातील नावीन्य, दूरदृष्टी आणि गुणवत्ता यांच्या जोरावर ॲल्युमिनियम क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवत त्यांनी उद्योग उभारला असून, देशाच्या औद्योगिक प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या तौरल इंडिया कंपनीमार्फत चाकण आणि सुपा येथील उत्पादन केंद्रांतून ॲल्युमिनियम कास्टिंगचा पुरवठा देश-विदेशातील विविध औद्योगिक क्षेत्रांना केला जात आहे.

ब्रिटिश संसदेच्या ऐतिहासिक परिसरात मिळालेला हा सन्मान केवळ भरत गीते यांच्या कार्याचा गौरव नसून, भारतीय उद्योजकतेच्या जागतिक यशाचा ठसा मानला जात आहे. गीते यांचा हा सन्मान नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, ‘स्थानिक ते जागतिक’ या प्रवासाचा तो एक उत्तम आदर्श ठरला आहे.











# पुण्यातील 11 महापालिका दवाखाने होणार हायटेक

## आरोग्य सुविधेला मिळणार नवसंजीवनी; 90 कोटींच्या तरतुदीतून 11 दवाखान्यांचे होणार जनरल हॉस्पिटलमध्ये रूपांतर.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या आरोग्य सुविधांना बळकटी देण्यासाठी शहरातील ११ महापालिका दवाखान्यांचे अत्याधुनिक जनरल रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेनुसार सहा प्रसूतिगृहे आणि पाच बाह्यरुग्ण विभाग असलेल्या रुग्णालयांची निवड करण्यात आली असून, यासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शहरातील गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणावर महापालिकेच्या आरोग्य सेवांवर अवलंबून आहेत. महापालिकेचे ५४ बाह्यरुग्ण विभाग आणि १९ प्रसूतिगृहे शहरातील विविध भागांत कार्यरत आहेत. या केंद्रांमध्ये दररोज सुमारे ११ ते १२ हजार रुग्ण उपचारासाठी येतात.

मात्र, अनेक ठिकाणी अपुरी साधनसामग्री, मनुष्यबळाची कमतरता आणि प्रशासकीय विलंबामुळे आरोग्य सेवा मर्यादित राहिल्याचे चित्र आहे. महापालिकेकडे सध्या कमला नेहरू रुग्णालय हे एकमेव मोठे सर्वसाधारण रुग्णालय आहे. वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेता इतर निवडक रुग्णालयांचेही उन्नतीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

निवडलेल्या रुग्णालयांची महापालिकेच्या भवन विभाग आणि विद्युत विभागामार्फत संयुक्त पाहणी केली जाणार आहे. या पाहणीनंतर आवश्यक पायाभूत सुविधा, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, विद्युत व्यवस्था तसेच डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची उपलब्धता याबाबतचा सविस्तर आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

या ११ दाखान्यांमध्ये येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालय, वडगाव येथील लायगुडे रुग्णालय, बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय, शिवाजीनगर येथील दळवी रुग्णालय आणि गाडीखाना येथील मालती काची रुग्णालय यांची निवड करण्यात आली आहे.



### 'या' रुग्णालयांचा योजनेत समावेश

» या योजनेत येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालय, वडगावचे लायगुडे रुग्णालय, बोपोडीचे संजय गांधी रुग्णालय, शिवाजीनगरचे दळवी रुग्णालय आणि गाडीखान्यातील मालती काची रुग्णालय यांचा समावेश आहे. तसेच सोनवणे प्रसूतिगृह, राजमाता जिजाऊ नर्सिंग होम, धनकवडी, शिवरकर, सुतार आणि खेडेकर रुग्णालयांचाही यात समावेश करण्यात आला आहे. भवन आणि विद्युत विभागामार्फत संयुक्त पाहणी करून सविस्तर आराखडा तयार केला जाणार आहे.

### ११ दवाखान्यांचे होणार उन्नतीकरण

» पुणे महापालिकेच्या आरोग्य सुविधांना बळकटी देण्यासाठी शहरातील ११ महापालिका दवाखान्यांचे अत्याधुनिक जनरल रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेनुसार सहा प्रसूतिगृहे आणि पाच बाह्यरुग्ण विभागांची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

### वाढत्या रुग्णसंख्येमुळे निर्णय

» महापालिकेच्या ५४ बाह्यरुग्ण विभाग आणि १९ प्रसूतिगृहांमध्ये दररोज ११ ते १२ हजार रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, अपुरी साधनसामग्री, मनुष्यबळाची कमतरता आणि प्रशासकीय अडचणींमुळे आरोग्य सेवा मर्यादित राहत असल्याचे चित्र आहे. कमला नेहरू रुग्णालय हे सध्या महापालिकेचे एकमेव मोठे सर्वसाधारण रुग्णालय आहे. वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची गरज लक्षात घेऊन इतर रुग्णालयांचेही उन्नतीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# बालभारती-पौड फाटा रस्त्यासाठी महापालिकेचे एक पाऊल पुढे !

## वादग्रस्त ठरलेल्या पण महत्त्वाच्या रस्त्यासाठी महापालिकेने आता पर्यावरण परवानगी मिळवण्याच्या हालचालींना गती दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या विकास आराखड्यात (डीपी) प्रस्तावित करण्यात आलेल्या बालभारती ते पौड फाटा रस्त्याच्या कामासाठी महापालिकेने एक पाऊल पुढे टाकले आहे. पर्यावरण विभागाचे प्रमाणपत्र (ईसी) मिळविण्यासाठी सल्लागार नियुक्त केला जाणार आहे.यासाठी सुमारे सव्वा कोटी रुपयांच्या खर्चाला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महापालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराने पर्यावरण विभागाचे प्रमाणपत्र मिळवून दिल्यानंतर या रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

कर्वे रस्ता आणि विधी महाविद्यालय रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपयुक्त असलेल्या बालभारती ते पौड फाटा रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. या रस्त्याच्या कामाला पर्यावरणप्रेमींनी विरोध केला आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून या रस्त्याचे काम थांबले आहे. या रस्त्याच्या कामाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या रस्त्याबाबत महापालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्रदेखील दिले आहे.

न्यायालयाने यावर एक समिती स्थापन केली असून, सुमारे ३० मीटर रुंदीच्या या रस्त्याच्या कामासाठी पर्यावरण विभागाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' (एन्व्हायरोमेंटल क्लिअरन्स सर्टिफिकेट) घ्यावे, अशा सूचना दिल्या आहेत. 'स्टेट एन्व्हायर्मेंट इम्पॅक्ट असेसमेंट कमिटीला' या प्रकरणी सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यावर आता महापालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

हा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्याला बैठकीत मान्यता दिल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले. या सल्लागाराच्या माध्यमातून पर्यावरणाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया राबविता येणार आहे, असे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.



### पर्यावरणवाद्यांचा विरोध का ?

» बालभारती ते पौड फाटा हा रस्ता करताना टेकडी फोडली जाणार आहे, त्यामुळे येथील नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण होणार असल्याचा दावा पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून केला जात आहे. हा रस्ता होऊ नये, यासाठी पर्यावरणप्रेमी नागरिक प्रयत्नशील आहेत. हा रस्ता झाल्यास आणि तिथून वाहतूक सुरू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात प्रदूषण होईल याचा परिणाम आजूबाजूच्या नैसर्गिक साधन संपत्तीवर होईल. त्यामुळे या रस्त्याला विरोध केला जात आहे. पर्यावरण प्रेमींच्या या विरोधामुळे रस्ता तयार करण्याच्या खर्चात अनेक कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

# पुण्यात होणार 100 वे अखिल भारतीय साहित्य संमेलन; चंद्रकांत पाटील यांची घोषणा

## 'पुणे बाल पुस्तक जत्रे'चा उत्साहात शुभारंभ; मुलांसाठी वाचन, विज्ञान व सर्जनशील उपक्रमांची मेजवानी

**पुणे | प्रतिनिधी**

यंदाचे शंभरावे अखिल भारतीय साहीत्य संमेलन पुण्यात होणार असुन याला सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल अशी माहीती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात दिली. उन्हाळ्याच्या सुट्टीत लहान मुलांच्या कल्पनाशक्तीला नवी भरारी मिळावी आणि त्यांना वाचनाच्या रंगीबेरंगी, समृद्ध विश्वाची ओळख व्हावी, या उद्देशाने शहरात आजपासून 'पुणे बाल पुस्तक जत्रा' उत्साहात सुरू झाली आहे. या जत्रेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आमदार हेमंत रासने, मराठी भाषा विभागाचे संचालक श्यामकांत देवरे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण, संवाद पुणेचे सुनील महाजन आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



AI Generated Image

### मराठी भाषा जागतिक स्तरावर नेण्याचा प्रयत्न

» मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आंतरराष्ट्रीय भाषा केंद्र लंडनमध्ये सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मराठी भाषेचे ७५ आंतरराष्ट्रीय मंच उभारण्याचे काम सुरू असून त्यापैकी ३९ मंच पूर्ण झाले आहेत. दरम्यान, आंबेगाव येथील शिवसृष्टी महिला व लहान मुलांसाठी मोफत करण्यात आल्याची माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.

या जत्रेचे यंदाचे दुसरे वर्ष असून पुणे पुस्तक महोत्सव, पुणे महानगरपालिका, समर्थ युवा फाऊंडेशन आणि संवाद पुणे यांच्या वतीने या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे ४ मे पर्यंत चालणाऱ्या या जत्रेत पुस्तकांच्या प्रदर्शनाबरोबरच विज्ञान गप्पा, कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन आणि लहान मुलांच्या विकासासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मराठी भाषा संचालनालयाच्या तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

१०० हून अधिक पुस्तक दालनांनी सजलेल्या या जत्रेत मुलांसाठी ज्ञान, करमणूक आणि सर्जनशीलतेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. चार एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या जत्रेत 'गीतरामायण' पपेट शो, जादूचे प्रयोग, विविध साहसी आणि ग्रामीण खेळांची ओळख, मुलांचे कविसंमेलन तसेच आवडत्या लेखकांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी अशा विविध आकर्षक उपक्रमांची मेजवानी लहानग्यांना मिळणार आहे.महाराष्ट्र साहित्य परिषदेत मराठी बालविभाग सुरु करण्यात येणार असल्याचे योगेश सोमण यांनी यावेळी सांगितले.राज्याचे उद्योग व मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत आभासी पद्धतीने कार्यक्रमात सहभागी झाले होते.

### शंभरावे अखिल भारतीय साहित्य संमेलन

» यंदाचे शंभरावे अखिल भारतीय साहित्य संमेलन पुण्यात होणार असून राज्य सरकारकडून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. 'पुणे बाल पुस्तक जत्रे'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने, योगेश सोमण, श्यामकांत देवरे आदी मान्यवर उपस्थित होते. साहित्य, वाचन आणि संस्कृतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### बाल पुस्तक जत्रेत उपक्रमांची मेजवानी

» स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे सुरू झालेल्या 'पुणे बाल पुस्तक जत्रे'त १०० हून अधिक पुस्तक दालने उभारण्यात आली आहेत. विज्ञान गप्पा, कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन, पपेट शो, जादूचे प्रयोग, कविसंमेलन आणि ग्रामीण खेळांची ओळख असे विविध उपक्रम येथे आयोजित करण्यात आले आहेत. मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी आणि वाचन संस्कृती रुजवण्यासाठी या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. जत्रा ४ मेपर्यंत सुरू राहणार आहे.

---

# गाळमुक्त धरण अभियानाला वेग; शेतकऱ्यांना मोफत गाळ

## 'खडकवासला' मॉडेलच्या यशातून राज्यात 'नवीन जलक्रांती'ची दिशा; या उपक्रमामुळे शेतीची सुपीकता वाढण्यास मदत

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या 'गाळमुक्त धरण' अभियानामुळे सिंहगड, पानशेत, वरसगाव तसेच राजगड, हवेली आणि मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतजमिनीत टाकण्यासाठी मोफत गाळ व लाल माती उपलब्ध करून दिली जात आहे. या उपक्रमामुळे शेतीची सुपीकता वाढण्यास मदत होत आहे



जलसंपदा व जलसंधारण विभाग, नाम फाउंडेशन आणि टाटा मोटर्स यांच्या संयुक्त पुढाकारातून धरणांतील गाळ काढण्याचे काम सुरू आहे. यासाठी 22 जेसीबी, पोकलॅन यंत्रे तसेच 44 ट्रॅक्टर-डंपरचा वापर केला जात आहे.

काढलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत देण्यात येत असून धरण तीरावर वृक्षलागवड आणि शेतरस्ते विकसित करण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे, अशी माहिती नाम फाउंडेशनचे सहाय्यक नीलेश जावळकर यांनी दिली.

सध्या पानशेत, वरसगाव, खडकवासला धरणांसह मुळशी तालुक्यातील रिहे तलाव, पिंपोळी-खांबोली, आंधळे तलाव तसेच हवेलीतील ओढे व बंधाऱ्यांमधील गाळ काढण्याचे काम सुरू आहे. आमदार भीमराव तापकीर आणि आमदार शंकर मांडेकर यांनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या उपक्रमात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, खडकवासला भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष शरद जावळकर, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष धनराज जोरी, हवेलीचे माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, शिरकोली अमोल पडवळ, कादवेचे विनोद बिरामणे, आंबीचे सरपंच पोपटराव निवंगुणे, तानाजी थोपटे, सुशांत खिरीड, अण्णा दिघे, अविनाश पायगुडे, तानाजी पवळे, रवींद्र हाडके, अनिल शिंदे, दत्तात्रय पवळे, केतन जावळकर, अनिल जावळकर आदी उपस्थित होते.

### ...म्हणून अभियानाला चालना

» ग्रीन थंब संस्थेचे अध्यक्ष कर्नल सुरेश पाटील यांच्या पुढाकारातून खडकवासला धरणातील गाळ काढण्याचा उपक्रम राबविण्यात आला. लोकसहभागातून काढलेला गाळ शेतजमिनीत वापरल्याने सुपीकता वाढली. मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व पायाभूत सुविधा उभारल्या गेल्या. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असून धरणाची पाणी साठवण क्षमता सुधारली आहे. या यशस्वी मॉडेलमुळे राज्यभर गाळमुक्त धरण अभियानाला चालना मिळाली आहे.